# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
# (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परिपत्रक क्र. १७६/२०१५

**६८ वा स्वातंत्र्यदिन १५ ऑगस्ट, २०१५.**

भारताच्या ६८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त शनिवार, दिनांक १५ ऑगस्ट, २०१५ रोजी विद्यापीठाच्या प्रशासन भवन इमारतीसमोर ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे.

**कार्यक्रमाचा तपशील पुढीलप्रमाणे**

१. सकाळी ६.३० ते ७.३० : सनई चौघडा वादन
२. सकाळी ठीक ७.३० वाजता : मा. कुलगुरु डॉ. वासुदेव गाडे यांचे हस्ते ध्वजारोहण.
३. राष्ट्रगीत
४. मा. कुलगुरु यांचे भाषण
५. मा. कुलगुरु डॉ. वासुदेव गाडे यांच्या हस्ते उपस्थित बालकांना खाऊचे वाटप.
६. चहापान

स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमाचे राष्ट्रीय महत्व लक्षात घेऊन व कर्तव्याचा भाग म्हणून विद्यापीठातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी आणि विद्यापीठ परिसरातील निवासी या सर्वांनी वरील कार्यक्रमास अवश्य उपस्थित रहावे, ही विनंती.

गणेशखिंड, पुणे ४११००७. )
जा. क्र. ससा/स्वातंत्र्यदिन/१९७ )
दिनांक : ०५/०८/२०१५

कुलसचिव

**प्रत माहितीसाठी व प्रसिध्दीसाठी :—**

१. मा. व्यवस्थापन परिषद सदस्य
२. मा. अधिष्ठाता
३. मा. अधिसभा सदस्य
४. मा. विद्यापरिषद सदस्य
५. मा. विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग
६. मा. शाखाप्रमुख, प्रशासकीय शाखा

) यांना विनंती की, त्यांचे अधिकार कक्षेत ) काम करणाऱ्या सर्व सेवकांना वरील कार्यक्रमास उपस्थित राहण्याबाबत सांगावे व तशी उपस्थितीबद्दलची लेखी नोंद ठेवावी.

७. मा. प्राचार्य, संलग्न महाविद्यालये, पुणे शहर
८. मा. संचालक, मान्यताप्राप्त संस्था, पुणे शहर
९. मा. वसतिगृहप्रमुख, पदव्युत्तर विद्यार्थी

) यांना विनंती की वसतिगृहातील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींना उपरोक्त कार्यक्रमास उपस्थित राहण्यास सांगावे.

१०. मा. अध्यक्ष, सर्व शिक्षक व शिक्षकेतर संघटना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे

) यांना विनंती की, विद्यापीठ परिसरात ) राहणाऱ्या रहिवाशांना उपरोक्त कार्यक्रमास ) हजर राहण्यास सांगावे.